# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११००५.

## प्र क ट न

क्र.पु.वि.मं./शाखा-क/2205
पुणे ४११ ००५.
दि.०६.१२.२०१७

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
पुणे/अहमदनगर/सोलापूर.
जिल्हा- पुणे/अहमदनगर/सोलापूर.

विषय- मार्च २०१८ मध्ये घेण्यात येणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेची आवेदनपत्र अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काने सादर करणेबाबत...

या प्रकटनाव्दारे सर्व माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांना कळविण्यात येत की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) मार्च २०१८ परीक्षेस प्रविष्ठ होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह आवेदनपत्र स्विकारण्याची मुदत संपल्यानंतरही आवेदनपत्र अतिविलंब/ विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काने स्विकारण्यात येतात. सदर शुल्काने आवदेनपत्र स्विकारण्याचा कालावधी कमी असल्याने नियमानुसार अतिविलंब शुल्काचे उपरोक्त कालावधी या परीक्षेपुरता कमी करुन त्याचे तीन टप्पे करण्यात आले असून त्यानुसार अतिविलंब/ विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवदेनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत रु.५०/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत रु.१००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे | अति विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत रु.२००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा | शुक्रवार, दि.०८.१२.२०१७ पासून बुधवार, दि.१०.०१.२०१८ पर्यंत | गुरुवार, दि.११.०१.२०१८ पासून गुरुवार, दि.२५.०१.२०१८ पर्यंत | शुक्रवार,दि.२६.०१.२०१८ पासून शुक्रवार, दि.०९.०२.२०१८ पर्यंत |

अतिविलंब शुल्काची आवेदनपत्रे ही माध्यमिक शाळांनी ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर भरावयाची आहेत. त्यानंतर विद्यार्थी व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची मूळप्रत (Pring Out), अतिविलंब शुल्कासह भरलेल्या रकमेचे चलन व यादी दुस-या दिवशी (शासकीय सुट्टी वगळता) मंडळाकडे सादर करण्यात यावेत. मात्र त्यानंतर जर माध्यमिक शाळा आवेदनपत्रे मंडळाकडे जमा करण्यास येतील अशा शाळांकडून नियमानुसार आवेदनपत्र जमा करण्याच्या दिवसापर्यंतचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क घेण्यात येईल. आवेदनपत्र (**Blank Templete form**) मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

शाळा प्रमुखांनी परस्पर विद्यार्थ्यांना मंडळ कार्यालयात पाठवू नये. सदर अतिविलंब/ विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवदेनपत्र सादर करतांना त्यामध्ये विषयांची मागील गुणपत्रिकेवरुन विषय सूट, केंद्र क्रमांक, आवेदनपत्र क्रमांक व विषयाची माहिती अचूक भरण्याची जबाबदारी आपणांवर असून, सदर माहिती चुकीची प्राप्त झाल्यास, त्यास मंडळ जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब आवेदनपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यास मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेणार नाही, असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे.

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११ ००५.

यांचे करिता

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव
**मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) - पुणे/अहमदनगर/सोलापूर**

39 prakatan